**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दुरध्वनी क्र.** 0253-2461909 **Email- kumbhmela.2027@mah.gov.in**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/बैठक/इतिवृत्त/2025/51 दिनांक: स्वाक्षरीखाली नमूद आहे.

प्रति,

1. मा. जिल्हाधिकारी, नाशिक.
2. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
3. मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
4. मा. विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मध्य रेल्वे, भूसावळ.
5. मा. पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.
6. मा. गॅरिसन अभियंता (दक्षिण), भारतीय लष्करी अभियांत्रिकी सेवा, देवळाली.
7. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक.
8. उपविभागीय अधिकारी, नाशिक.
9. वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय), मध्य रेल्वे, भूसावळ.
10. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.

विषय:- दिनांक 18/08/2025 रोजी रेल्वे स्थानकांवर करावयाच्या गर्दी नियंत्रण व वाहतूक व्यवस्थेबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सिंहस्थ कुंभमेळा 2027-28 अंतर्गत दिनांक 18/08/2025 रोजी मा. अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त महोदय यांचे अध्यक्षतेखाली कसबे सुकेणे रेल्वे स्टेशन, ओढा रेल्वे स्टेशन, खेरवाडी रेल्वे स्टेशन, नाशिक रोड रेल्वे स्टेशन आणि देवळाली रेल्वे स्टेशन या रेल्वे स्थानकांवर करावयाच्या गर्दी नियंत्रण व वाहतूक व्यवस्थेबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त यासोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

सोबत:- वरिल प्रमाणे.

Signed by Karishma
Nandakumaran Nair
Date: 08-10-2025 20:57:47

(करिष्मा नायर)
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव,
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक

रेल्वे स्थानकांवर करावयाच्या गर्दी नियंत्रण व वाहतूक व्यवस्थेबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक रोड, नाशिक येथे सन २०२७-२८ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी महत्तवाच्या रेल्वे स्थानकांबाबत करावयाच्या गर्दी नियंत्रण व वाहतूक व्यवस्थेच्या अनुषंगाने रेल्वे विभाग, पोलीस विभाग, नाशिक महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ या विभागांसोबत बैठक झाली. सदर बैठकीस श्री जलज शर्मा, जिल्हाधिकारी, नाशिक, श्रीमती मनिषा खत्री, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक, श्रीमती करिष्मा नायर, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक, श्री आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, श्री पंकज धावरे, वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय), मध्य रेल्वे, भूसावळ (VC द्वारे), श्री चंद्रकांत खांडवी, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय व वाहतूक), नाशिक शहर, श्री किशोर काळे, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ- २) नाशिक शहर व इतर अधिकारी उपस्थित होते.

श्री पंकज धावरे, वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय), मध्य रेल्वे, भूसावळ यांनी सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७-२८ अंतर्गत मध्य रेल्वे अंतर्गत येणाऱ्या कसबे सुकेणे रेल्वे स्टेशन, खेरवाडी रेल्वे स्टेशन, ओढा रेल्वे स्टेशन, नाशिक रोड रेल्वे स्टेशन आणि देवळाली रेल्वे स्टेशन येथे गर्दी नियंत्रण व वाहतूक व्यवस्थेबाबत करावयाच्या नियोजनासंदर्भात रेल्वे विभागाने तयार केलेल्या आराखड्याचे सादरीकरण केले. सादरीकरणानंतर पुढील प्रमाणे सूचना देण्यात आल्या.

१. कसबे सुकेणे रेल्वे स्टेशन व खेरवाडी रेल्वे स्टेशन येथे भाविकांच्या गर्दी नियंत्रणासाठी व वाहतूक व्यवस्थेसाठी रेल्वे विभागाने तयार केलेल्या आराखड्यास तत्वत: मंजूरी देण्यात आली. तथापि याबाबत सर्व संबंधित विभागांनी आराखड्यात सविस्तर तपशिल नमूद करावा.
२. ओढा रेल्वे स्टेशन, नाशिक रोड रेल्वे स्टेशन आणि देवळाली रेल्वे स्टेशन यांच्या आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तथापि सदर तीनही रेल्वे स्टेशनच्या आराखड्यात त्रुटी असल्याने पोलीस विभागाने सदरच्या त्रुटी दूर करुन परिपूर्ण आराखडा तयार करुन त्यावर इतर विभागांचे अभिप्राय घ्यावे व त्यानंतर सुधारित आराखडा पुढील १५ दिवसात मान्यतेसाठी सादर करावा.
३. अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी थेट त्र्यंबकेश्वर ला जाणाऱ्या भाविकांसाठी उतरण्यासाठी घोटी रेल्वे स्टेशन येथे देखील व्यवस्था करण्यात यावी अशी विनंती केली. यावर रेल्वे विभागाने त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बोलून उपरोक्त सूचनेची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 18-08-2025 18:21:05

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा,
विभागीय आयुक्त, नाशिक.

# बैठकीस उपस्थितांची यादी

| अ.क्र. | नाव, पदनाम व कार्यालय |
|---|---|
| 1 | श्री. जलज शर्मा, जिल्हाधिकारी, नाशिक |
| 2 | श्रीमती. मनिषा खत्री, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| 3 | श्रीमती. करिष्मा नायर, कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण |
| 4 | श्री आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण |
| 5 | श्री पंकज धावरे, वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय), मध्य रेल्वे, भूसावळ (VC द्वारे) |
| 6 | श्रीमती अर्पिता ठुबे, SDM AND PO NASHIK |
| 7 | श्री .चंद्रकांत खांडवी, पोलीस उपआयुक्त (मुख्यालयव वाहतूक), नाशिक शहर |
| 8 | श्री. किशोर काळे , पोलीस उपआयुक्त (परिमंडळ – 2), नाशिक शहर |
| 9 | श्री रविंद्र भारदे, उपजिल्हाधिकारी, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक |
| 10 | श्री. योगेश गरड, वरिष्ठ विभागीय अभियंता, मध्य रेल्वे |
| 11 | श्री . व्ही. के. मिश्रा, सहायक विभागीय अभियंता, मध्य रेल्वे |
| 12 | श्री. राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) |
| 13 | श्री. जितेंद्र सपकाळे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, नाशिक रोड |
| 14 | श्री योगेश सोमवंशी, सहायक संशोधन अधिकारी, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक |
| 15 | श्री मनीष गर्ग, GE, देवळाली MES |
| 16 | श्री संजय पिसे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, आडगाव |
| 17 | श्री किरण भोसले, विभागीय वाहतूक नियंत्रक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक |
| 18 | श्री . अनिकेत कुलकर्णी, E&Y |
| 19 | श्री ज्ञानेश्वर पवार |
| 20 | श्री रविंद्र बागूल, कार्यकारी अभियंता, नाशिक महानगरपालिका |